# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या वयोगट रचनेचे विश्लेषण-

**प्र.डॉ एन.एन. घोलप**
कर्मवीर आबासाहेब तथा ना.म.सोनवणे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सटाणा ता. बागलाण, जि. नासिक

***सारांश :-***

*महाराष्ट्र हे देशातील एक औद्योगिकदृष्टया महत्वाचे राज्य असून या राज्यात वेगवेगळया धर्माचे, जातीचे, जमातीचे लोक राहतात. त्यांची जीवनशैलीही अतिशय वैशिष्ट्येपूर्ण् आहे.आपल्याच राज्यातील नाशिक जिल्हा हा एक विकसित जिल्हा म्हणून एक वेगळी ओळख आहे. नाशिक जिल्हयात "२५.६१" (**संदर्भ-जनगणना,२०११**) देखिल आदिवासी लोकसंख्या मोठया संख्येने वास्तव्य करत आहे. आदिवासी बांधव अतिशय जिकिरीचे जीवन जगत आहे. म्हणून या आदिवासी बांधवांच्या वयोरचनेचा अभ्यास व्हावा म्हणून हे संशोधन करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.*

*प्रस्तुत संशोधन प्रपत्रात ४०० आदिवासी लोकांच्या मुलाखती घेऊन वयोगटाची काय स्थिती आहे हे जाणून घेतलेले आहे. प्रत्यक्ष मूलाखती घेऊन हा अभ्यास केलेला आहे. वयोगटाच्या अभ्यासावरून कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्यंची काय स्थिती आहे, याचा अभ्यास करून विश्लेषण केलेले आहे. अभ्यासासाठी पाच तालुके घेण्यात आलेले होते, त्यामध्ये सटाणा, कळवण, दिडोरी, पेठ, सुरगाणा या क्षेत्रातील तालुकानिहाय काही पुढील बाबी प्रकर्षाने लक्षात आल्या.*

*अभ्यासक्षेत्रातील पाच तालुक्यातील ४०० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षण केलेल्या कुटुंबाची एकुण लोकसंख्या २०४७ असून त्यामध्ये पुरूषांची ११२७ व स्त्रियांची संख्या ९२० इतकी आहे. सर्वेक्षित कुटुंबातील पुरूषांचे प्रमाण ५५.०६ टक्के इतके असून स्त्रियांचे प्रमाण ४४.९४ टक्के ऐवढे आहे. यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रामध्ये लिंगगुणोत्तर विचारात घेता स्त्रियांपेक्षा पुरूषांचे प्रमाण जास्त आहे. अभ्यासक्षेत्रातील तालुका निहाय विचार करता सटाणा तालुक्यात सर्वेक्षित कुटुंबातील पुरुषांचे प्रमाण ५४.४२ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ४५.५८ टक्के इतके असल्याचे दिसते. थोडक्यात या तालुक्यामध्ये ९ टक्के स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेने कमी असल्याचे निदर्शनास येते.*

*कळवण तालुक्यात एकूण पुरूषांचे शेकडा प्रमाण ५७. ८९ एवढे असून स्त्रियांचे शेकडा प्रमाण ४२.११ इतके आहे. दिंडोरी तालुक्यात पुरूषांचे प्रमाण शे्कडा ५७.२७ तर स्त्रियांचे प्रमाण४२.७३ एवढे आहे.तसेच पेठ तालुक्यात पुरूषाचे प्रमाण ५४.४३ तर स्त्रियांचे प्रमाण४५.५७ इतके असून सुरगाणा तालुक्यात ही स्थिती पुरूषांची ५१.४८ व स्त्रियांची ४८.५२ अशी आहे. तसेच अभ्यास क्षेत्रात पुरूष बालकांची व स्त्रिया बालकांची ०ते ६ या वयोगटातील एकूण लोकसंख्या अतिशय कमी असून ती अनुक्रमे ३.२७ व २.२० इतकी आहे. तर ६० च्या पुढे म्हणजेच वृध्द लोकांची संख्या कमी आहे. ७ ते १४ या वयोगटातील एकूण पुरूषांची लोकसंख्या ७.७९ तर स्त्रियांची संख्या एकूण शेकडा ४.६७ इतकी आहे. एकूणच प्रौढ वर्गाची लोकसंख्या तुलनेने आस्त आहे.एकूणच स्त्रियांची संख्या वयोगटात कमी असल्याचे दिसते. याचाच अर्थ असा की मुलींच्या जन्माकडे बघण्याचा दृष्टीकोण बदललेला नाही, आरोग्याकडे व्यवस्थित लक्ष दिले जात नाही,मुलिंचा जन्म वाईट असतो. आशा प्रकारची भावना कुठेतरी दडलेली दिसते. मुलींचे विवाह बहुतेक कमी वयात केले जातात. "Majority of girls and boys among STs in Maharashtra are getting married after attaining the legal age of marriage" (Source-Office of the Registrar General India,2011)*

*सर्वच तालुक्यामध्ये तुलनेने स्त्रियांचे प्रमाण हे पुरुषांच्या तुलनेने हे कमी आहे. सुरगाणा तालुक्यात मात्र पुरूष व स्त्रियांमधील तफावत ही तुलनेने कमी आहे. कारण मुली हे परक्याचे धन असते, ही भावना आजही कुठेतरी मनात घर करून बसल्याचे दिसते. स्त्रियांसाठी आरोग्याच्या सुविधांची कमतरता, त्यांना होणारे वेगवेगळे शारीरिक आजार या बाबतचा अज्ञानपणा आशा गोष्टी विशेष करून निदर्शनास येतात.*

***बीज वाक्य** :- आदिवासी लोकांची लिंग, वयोगट रचना, कारणे व निष्कर्ष*

**प्रस्तावना:-**

आदिवासी समाज हा नेहमी वैशिष्टयेपूर्ण राहिलेला आहे. कारण त्यांची जीवनशैली असेल किंवा त्यांच्या चालिरिती असतील ह्या नेहमीच वेगवेगळया राहिलेल्या आहे. याचबरोबर त्यांचे कुटुंबही महत्वाचे आहे.म्हणून त्यांच्या कुटुंबाची रचना व वयोगटना यांचा अभ्यास करताना त्यांच्या सदस्य संख्येचे अध्ययन करून वयोगटाचाही अभ्यास केलेला आहे. वयोगटाच्या अभ्यासामुळे तरूण, प्रौढ व वृध्द लोकांची स्थिती लक्षात येते. त्यावरून कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्या किती आहे याचा अंदाज येतो. कारण कोणत्याही समाज्याच्या वयोगटाच्या रचनेवरून आपल्याला विकासाची स्थिती कळते. त्यामुळे भविष्यकालीन काही अंदाज करता येतात. एकूण लोकसंख्येत

कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्येचे प्रमाण किती आहे. यावरून त्या समाजाची विकासाची स्थिती काय असेल याचा अंदाज करता येतो. तसेच यावर किती खर्च करावा लागेल याचेही पूर्व नियोजन करता येते. **"वयोरचनेचा उपयोग श्रमशक्ती,जन्मदर व मृत्युदर ठरविण्यासाठी फार महत्वाचा आहे".(संदर्भ- डॉ. टी. एन. घोलप - लोकसंख्या भूगोल, निशिकांत प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९९७, पान नं. १३६)** याशिवाय तरूण वर्गाची संख्या किती त्यांना कोणकोणत्या सवलती द्याव्या लागतील यासाठीही वयोगट रचनेचा अभ्यास महत्वाचा ठरतो. तसेच पुरूष व स्त्रियांचे प्रमाण किती आहे. एकूणच अभ्यासावरून भविष्य काळात आर्थिक नियोजनासाठी काय करावे लागेल याचाही अंदाज करता येतो.लोक संख्येच्या लैगिक वयोरचनेच्या अभ्यासामुळे कार्यप्रवण व कार्यरहित लोकसंख्या यांचे प्रमाण समजते त्यामुळे अवलंबता भार मोजता येतो. **"लोकसंख्या वयोविभजनावर आधारलेले अवलंबता भार मोजणारे परिणाम म्हणजे अवलंबता गुणोत्तर होय" (सदर्भ- डॉ. टी. एन. घोलप - लोकसंख्या भूगोल, निशिकांत प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९९७, पान नं. १४०)**

**अभ्यासाची उद्दिष्टये :-**

१.आदिवासीं लोकांच्या वयोगट रचनेचा अभ्यास करणे
२.वयोगट रचनेवर परिणाम करणा-या घटकांचे विश्लेषण करणे
३. आदिवासीं लोकांच्या लिंग निहाय स्थितीचा अभ्यास करणे

**माहिती स्त्रोत व अभ्यास पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी माहितीचे स्त्रोत हे प्राथमिक व द्वितीय स्वरूपाचे आहेत. प्राथमिक स्वरूपाच्या स्त्रोतामध्ये आदिवासी भागात जाऊन ४०० आदिवासी अनुभवी बांधवांच्या मुलाखती घेतलेल्या असून अनुसूचीव्दारे माहितीचे संकलन केलेले आहे. तसेच विशेष म्हणून काही सुशिक्षित व असुशिक्षित तरूणांच्याही मुलाखती घेवून प्राथमिक स्वरुपाची माहिती उपलब्ध केलेली आहे. तसेच परिसरातील शिक्षक, व ज्या लोकांनी प्रत्यक्ष या भागात काम केलेले आहे त्यांचाही अनुभव विचारात घेतलेला आहे.प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षणानुसार संकलन केलेल्या माहितीचे संस्करण करून तिची टक्केवारी काढून विश्लेषण केलेले आहे.

**अभ्यास क्षेत्र:-**

नाशिक जिल्ह्यातील सटाणा, कळवण, दिंडोरी, पेठ व सुरगाण हे आदिवासी तालुके अभ्यासाठी निवडलेले असून या अभ्यास क्षेत्राची सीमा निश्चित करण्यात आलेली आहे. अभ्यास क्षेत्राच्या उत्तरेला धुळे जिल्ह्याची सीमा लाभलेली असून वायव्य भागाला गुजरात राज्यातील डांग जिल्ह्याची सीमा लाभलेली आहे. एका बाजुने सुरगाणा तर अभ्यास क्षेत्राच्या पूर्वेला नाशिक जिल्ह्यातील मालेगाव, तर दक्षिणेला त्र्यंबकेश्वर व नाशिक या तालुक्यांची सीमा लाभलेल्या आहेत. असे हे अभ्यास क्षेत्र निवडलेले असून हा प्रदेश डोंगर व द-या खो-यांनी व्यापलेला आहे. अभ्यास क्षेत्राचा सर्वसाधारण भौगोलिक अक्षवृत्तीय विस्तार १९ अंश ५५ मि, उ. ते २० अंश ५३ मि, उ. असा असून रेखावृत्तीय विस्तार ७३ अंश ०२ मि,पू ते ७४ अंश २४ मि, पू असा आहे.




Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2349-638x www.aiirjournal.com

**विषय विवेचन:-**

कोणत्याही प्रदेशालीत लोकसंख्या ही विविध गटात विभागलेली असते. लिंग, वय, वैवाहिक अवस्था, व्यवसाय, धर्म, भाषा इत्यादी आधारावर लोकसंख्येचे गट तयार होतात. त्यांचे तौलनिक प्रमाण प्रदेशानुसार जसे बदलते तसेच कालानुरूप बदलत असते. अभ्यासक्षेत्र तालुक्यातील आदिवासी कुटुंबातील सदस्य संख्येच्या आधारावर वयोगट रचना लिंगानुसार विश्लेषण केलेले आहे.

**तक्ता क्र.१**

**उत्तरदात्यांची लिगानुसार वयोगटरचना :- विश्लेषण**

| अ. न. | तालुके | सर्वेक्षित कुटुंबे | ० ते ६ | | ७ ते १४ | | १५ ते ३५ | | ३६ ते ६० | | ६०च्यापुढे | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | |
| १ | सटाणा | ८० | १० | ०९ | ४४ | २७ | ९८ | ८६ | ६८ | ६३ | ०८ | ०६ | २२८ | १९१ | ४१९ |
| २ | कळवण | ७६ | १४ | १२ | २७ | ०८ | १२० | ९६ | ६४ | ४८ | ०६ | ०४ | २३१ | १६८ | ३९९ |
| ३ | दिंडोरी | ९३ | १९ | १० | ३९ | २४ | १३० | ९८ | ६७ | ५५ | ०५ | ०७ | २६० | १९४ | ४५४ |
| ४ | पेठ | ६१ | ०९ | ०६ | १५ | ०६ | ८९ | ८७ | ५० | ३८ | ३० | ०२ | १६६ | १३९ | ३०५ |
| ५ | सुरगाणा | ९० | १५ | ०८ | ३३ | ३० | १०५ | १०४ | ७५ | ७४ | १४ | १२ | २४२ | २२८ | ४७० |
| | **एकूण** | **४००** | **६७** | **४५** | **१५८** | **९५** | **५४२** | **४७१** | **३२४** | **२७८** | **३६** | **३१** | **११२७** | **९२०** | **२०४७** |

संदर्भ - क्षेत्रीय सर्वेक्षण

**उत्तरदात्यांची लिंगानुसार वयोगटरचना (लोकसंख्या टक्केवारीत**


**तक्ता क्र.२**

| अ. न. | तलुके | ० ते ६ | | ७ ते १४ | | १५ ते ३५ | | ३६ ते ६० | | ६०च्यापुढे | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | |
| १ | सटाणा | .३९ | २.१५ | १०.५० | ०६.४४ | २३.३९ | २०.५३ | १६.२३ | १५.०४ | ०१.९१ | ०१.४३ | ५४.४२ | ४५.५८ | १०० |
| २ | कळवण | ३.५१ | ३.०१ | ०६.७७ | ०२.०१ | ३०.०८ | २४.०६ | १६.०४ | १२.०३ | ०१.५० | ०१.०० | ५७.८९ | ४२.११ | १०० |
| ३ | दिंडोरी | ४.१९ | २.२० | ०८.५९ | ०५.२९ | २८.६३ | २१.५९ | १४.७६ | १२.११ | ०१.१० | ०१.५४ | ५७.२७ | ४२.७३ | १०० |
| ४ | पेठ | २.१५ | १.९७ | ०४.९२ | ०१.९७ | २९.१८ | २८.५२ | १६.३९ | १२.४६ | ०.९८ | ०.६६ | ५४.४३ | ४५.५७ | १०० |
| ५ | सुरगाणा | ३.१९ | १.७० | ०७.०२ | ०६.३८ | २२.३४ | २२.१२ | १५.९५ | १५.७४ | ०२.९७ | ०२.५५ | ५१.४८ | ४८.५२ | १०० |
| | **एकूण** | ३.२७ | २.२० | ०७.७१ | ०४.६७ | २६.४७ | २३.०० | १५.८३ | १३.५८ | ०१.७५ | ०१.५१ | ५५.०६ | ४४.९६ | १०० |

संदर्भ - क्षेत्रीय सर्वेक्षण

**आलेख क्र.१**

**उत्तरदात्यांची वयोगटरचना**



दिलेल्या तक्त्यातील तक्ता क्र.१ नुसार सांख्यिकी माहितीसाठी अभ्यासक्षेत्रातील पाच तालुक्यातील ४०० कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षण केलेल्या कुटुंबाची एकूण लोकसंख्या २०४७ असून त्यामध्ये पुरूषांची ११२७ व स्त्रियांची संख्या ९२० इतकी आहे. सर्वेक्षित कुटुंबातील पुरूषांचे प्रमाण ५५.०६ टक्के इतके असून स्त्रियांचे प्रमाण ४४.९४ टक्के ऐवढे आहे. यावरून असे दिसते की, अभ्यासक्षेत्रामध्ये लिंगगुणोत्तर विचारात घेता स्त्रियांपेक्षा पुरूषांचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी लोकांमध्ये लग्नाचे वय कमी असते मुलगी वयात आलीकी लग्न केले जात असल्याने त्याचा परिणाम वयोरचनेवर होतो.

अभ्यास क्षेत्रातील तालुका निहाय विचार करता सटाणा तालुक्यात सर्वेक्षित कुटुंबातील पुरुषांचे प्रमाण ५४.४२ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ४५.५८ टक्के इतके असल्याचे दिसते. थोडक्यात या तालुक्यामध्ये ९ टक्के स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेने कमी असल्याचे निदर्शनास येते. एकूण वयोगटानुसार लिंग रचना विचारात घेतली तर पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी आढळते. कळवण तालुक्यात ० ते ६ वयोगटात पुरूष ३.५१ टक्के तर स्त्रियांचे शेकडा प्रमाण ३.०० टक्के इतके आहे. तसेच ७ ते १४ वयोगटातील पुरूष शेकडा प्रमाण ६.७७ व स्त्रियांचे प्रमाण ३.०१ ऐवढे असल्याचे दिसते. १५ ते ३५ या वयोगटात पुरूषांचे शेकडे प्रमाण हे १६.०४ व स्त्रियांचे १२.०३ टक्के इतके प्रमाण असून ३६ ते ६० या वयोगटात पुरूषांचे शेकडे प्रमाण १६.०४ व स्त्रियांचे प्रमाण १२.०३ टक्के इतके आहे. या तालुक्यात क ार्यप्रवण लोकसंख्येचे प्रमाण ८२.२१ टक्के इतके आहे.तसेच स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. याचाच अर्थ असा की स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण बदललेला नाही. त्यांच्या आरोग्याकडे व्यवस्थित लक्ष दिले जात नाही. साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी असल्याने बौध्दिक विकास कमी झालेला असला तरी साक्षरतेचे प्रमाण सावकाश गतीने वाढत आहे. **"The literacy rate,which was 36.8 percent in 1991,has increased by 18.4 percentage point in 2001" (Source-Ofice of the Registrar General India,2011)** दिंडोरी तालुक्यात ० ते ६ वयोगटात बलकांचे प्रमाण ४.१९ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण २.२० टक्के इतके असल्याचे दिसते. ७ ते १४ वयोगटातील पुरूष शेकडा प्रमाण ८.५९ टक्के व स्त्रीयांचे प्रमाण ५.२२ टक्के इतके प्रमाण आहे. १५ ते ३५ या वयोगटात पुरूषांचे प्रमाण हे २८.६३ व स्त्रियांचे प्रमाण २१.५९ टक्के एवढे आहे. तसेच ३६ ते ६० या वयोरचनेत पुरूषांचे १४.७६ व स्त्रियांचे १२.११ टक्के ऐवढे शेकडा प्रमाण असल्याचे निदर्शनात येते. ६० वयोरचनेच्या पुढे केवळ पुरूषांचे प्रमाण १.१० टक्के तर स्त्रियांचे प्रमाण ०१.५४ टक्के इतके अल्प असल्याचे दिसते. पेठ तालुक्यात वयोगट रचनेचा व लिंग रचनेचा विचार करता असे लक्षात येते की, ० ते ६ वयोगटात म्हणजे बालकांच्या गटात २.९५ टक्के तर मुलींचे प्रमाण या गटात १.९७ टक्के इतके आहे. आदिवासींमध्ये सरासरी बालमृत्युचे प्रमाणही जास्त असते.**"१ ते ३ वर्ष वयोगटात कुपोषणचे सर्वाधिक प्रमाण आढळते," (सदर्भ- भारतातील आदिवासी समाज डॉ.सुधाकर एल. जाधव चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद ,२०१२ पानं-२०५)** तर ७ ते १४ वयोगटातील पुरूष शेकडा प्रमाण ४.९२ टक्के व स्त्रियांचे प्रमाण १.९७ टक्के प्रमाण असल्याचे निदर्शनास येते. १५ ते ३५ या वयोगटात २९.१८ टक्के पुरूष व २८.५२ टक्के स्त्रियांचे प्रमाण असल्याचे दिसते. तसेच ३६ ते ६० या वयोगटात पुरूष व स्त्रियांचे लिंग गुणोत्तर विचारात घेता १६.३९ टक्के पुरूष व १२.४६ टक्के स्त्रियांचे प्रमाण असल्याचे दिसते.

सूरगाणा या तालुक्यातील वयोरचनेचा विचार करता असे दिसते की, ० ते ६ या वयोगटात पुरूषांचे प्रमाण ३.१९ टक्के व स्त्रियांचे १.७० टक्के इतके असल्याचे दिसते. ७ ते १४ या वयोगटात लिगं गुणोत्तर विचारात घेता ७.०२ व ६.३८ टक्के असे प्रमाण अनुक्रमे पुरूष व स्त्रियांच्या लिंग गुणोत्तराची स्थिती दर्शविते. ३६ ते ६० वयोगटात ७६.१५ टक्के ऐवढे आहे. या तालुक्यात लिंग गुणोत्तर तुलनात्मकदृष्ट्या विचारात घेता असे दिसते की, पुरूष व स्त्रियांमधील तफावत केवळ ३ टक्के एवढीच असल्याचे दिसते. या वरून या तालुक्यामध्ये पुरूष व स्त्रियांची संख्या जवळ - जवळ समान पातळीवर असल्याचे निदर्शनास येते. सर्वच अभ्यास क्षेत्रातील तालुक्यांमध्ये उत्तरदात्यांकडून मिळविलेल्या वयोगट व लिंग गुणोत्तराच्या माहितीवरून असे दिसते की, ० ते १४ व ६० च्या पुढील वयोरचनेत असलेल्या एकूण लोकसंख्येचे हे प्रमाण कमी आहे. तर १५ ते ६० या वयोरचनेत असणा-या लोकसंख्येचे प्रमाण हे अधिक असलेले दिसते. सर्वच तालुक्यामध्ये तुलनेने स्त्रियांचे प्रमाण हे पुरुषांच्या तुलनेने हे कमी आहे. सुरगाणा तालुक्यात मात्र पुरूष व स्त्रियां मधील तफावत ही कमी असल्याने ती समान पातळीवर आढळते. या वरून असे दिसते की, या तालुक्यात स्त्री समानता विशेष जाणवते. कारण या समाजात शिक्षणचा विकास आजही पाहिजे तितका झालेला नाही. म्हणून यासाठी शैक्षणिक चळवळ ही आदिवासी खेडयांपर्यंत नेणे आवश्यक आहे. केवळ त्यांना सोयी सवलती देवून चालणार नाही तर त्यांचे अंतर्मन बदले पाहिजे तरच ते शक्य आहे.

इतर तालुक्यामध्ये मात्र तुलनेने स्त्रियांचे प्रमाण हे कमी असल्याचे दिसते कारण, स्त्री ही परक्याचे धन असते. तसेच स्त्रीभ्रुण हत्या, स्त्रियांच्या आरोग्याच्या सुविधा, त्यांना होणारे वेगवेगळे शारीरिक आजार या बाबतचा अज्ञानपणा,अंधश्रध्दा रूढी परंपरा आशा गोष्टी विशेष करून निदर्शनास येतात. आदिवासी लोकांमध्ये बालकांमध्ये कुपोषणचे प्रमाण्ही सर्वात जास्त असते, त्यामुळे राहणीमान निकृष्ठ दर्जाचे असते. " **कुपोषण हे विशेषतः १ ते ५ वर्षे वयोगटातील मुले,गर्भवती स्त्रिया आणि स्तनदामाता या गटामध्ये जास्त प्रमाणात तर कमी प्रमाणत सर्वच वयोगटात आढळते"(सदर्भ-भारतातील आदिवासी समाज डॉ.सुधाकर एल.जाधव चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद,२०१२ पानं-२०५)** एकूण या अभ्यास क्षेत्रातील वयोरचनेच्या अभ्यासावरून असेही निदर्शनास येते की, सटाणा तालुक्यात २४.९ टक्के इतके कार्यरहित लोकसंख्येचे असल्याचे दिसते, तर कळवण तालुक्यात ये १७.७९ टक्के , तर दिंडोरी तालुक्यात २२.९१ टक्के इतके अवलंबताभाराचे प्रमाण आहे. पेठ तालुक्यात १५.५३ टक्के तर सुरगाणा तालुक्यात २३.८५ टक्के इतके कार्यरहित लोकसंख्येचे प्रमाण असल्याचे दिसते. या शिवाय जी कार्यप्रवण लोकसंख्या आहे त्यामध्ये देखील सर्वांनाच वर्षभर रोजगार उपलब्ध होताचे असे नसून काही लोकांना हंगामी स्वरूपात रोजगार उपलब्ध होत असल्याने उलट कार्यरहित लोकसंख्येचे प्रमाण वाढत जाते. त्यामुळे त्याचा राहणीमानावर व एकूणच आर्थिक विकासावर परिणाम झालेला दिसतो. म्हणून यालोकांना स्थानिक पातळीवर घरगुती व्यवसाय निर्माण करण्यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे. **"आदिवासी भाागात कृषी मालाचे उत्पादन वाढविल्यास, दुग्धोत्पादन वाढविल्यास स्थानिक पातळीवरच रोजगार निर्मिती केल्यास आर्थिक स्थिती बदलण्यास मदत होऊ शकेल. (सदर्भ- प्रा.सुरेश कोडीतकर, "आदिवासी जीवन कथा आणि व्यथा "सुगावा प्रकाशन,पुणे २००८,पान -१२**

**निष्कर्ष-**

अभ्यास क्षेत्रात प्रौढ लोकसंख्या जास्त असून सर्वच तालुंक्यात बालकांचे व वृध्द लोकांचे प्रमाण कमी आहे. तसेच अभ्यासक्षेत्रात एकूण ७८.८८ टक्के आदिवासी लोकसंख्या कार्यप्रवण असून २१.१२ टक्के लोकसंख्या कार्यरहित आहे. परंतू सर्वच लोकांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे राहणीमानावर परिणाम होऊन निकृष्ठ दर्जाचे जीवन जगतात. कार्यप्रवण लोकसंख्येचे प्रमाण जास्त असले तरी मजुरी करूनच आपली उपजिविका पूर्ण करतात. पुरूषांच्या तुलनेने स्त्रियांचे प्रमाण सर्वच वयोगटात कमी असून स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोण बदललेला दिसत नाही. अंधश्रध्दाळू समाज, आरोग्य सुविधांचा अभाव, सकस आहाराची कमतरता त्यामुळे कुषोषण सारख्या समस्या यामुळे आयुर्मानही तुलनेने कमी आहे. अशाच गतीने लिंग-गुणोत्तर बदलत राहिले तर नजीकच्या काही काळातच ही तफ़ावत सामाजिक अस्थिरता निर्माण करण्याची भिती नाकारता येणार नाही. म्हणून जनजागृती करून मुलींना जन्म देणा-यांना नोकरी इतर सवलती देण्यात याव्यात.

**संदर्भ -**

१) जनगणना बुक,२०११
२) Office of the Registrar General India,2011
३) डॉ. टी. एन. घोलप - लोकसंख्या भूगोल, निशिकांत प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९९७, पान नं. १३६,१४०
४) डॉ.सुधाकर एल. जाधव भारतातील आदिवासी समाज डॉ.सुधाकर एल. जाधव चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद ,२०१२ पानं-२०५
५) प्रा.सुरेश कोडीतकर, "आदिवासी जीवन कथा आणि व्यथा "सुगावा प्रकाशन,पुणे २००८,पान -१२०
६) प्रा. गौतम निकम, आदिवासीच्या समस्या: एक अभ्यास ,विमल किर्ती प्रकाशन,चाळीसगाव, १६ जाने.२०१५. पानं १६
७) क्षेत्रीय सर्वेक्षण
८) प्रा. ए. बी. सवदी The mega state महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे आवृत्ती तिसरी पान नं. २४९,२५०
९) Dr. A. Musmade Dr. A. Sonawane, Dr. J. More Population and Settlement, Geography, Diamond publication, Pune Edition 1st 2015, pp-63 to 65